वि. दि. दावा क्र. ५१३-२०२३
निशाण क्र. ११०

**प्रतिवादी १ ते ३ तर्फे सा.क्र. ४ यांना शपथ देण्यात आली.**

**नाव – मिलनकुमार उत्तमराव जपे, वय– ४९ वर्षे,**

**व्यवसाय – सिमेंट विक्री व्यवसाय**

**रा. करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर.**

**प्रतिवादी १ ते ३ तर्फे साक्षीदार क्र.०४ यांची सरतपासणी प्रतिवादी १ ते ३ तर्फे वकील श्री. बी.टी.देवी यांचे तर्फे शपथेवर सुरु –**

मी प्रतिवादी यांना ओळखतो ते माझेकडे सिमेंट घेणेकामी आलेले होते. त्यांनी माझे कडुन सिमेंट नेले होते. त्याची रक्कम मला मिळालेली आहे. मला चिंचकर यांनी रक्कम दिलेली होती. मी त्यांना सिमेंट विक्री केलेनंतर व रक्कम मिळाले नंतर त्यांना पावती दिल्या होत्या. आता मला अभिलेखावरील आर्टिकल उ, ऊ, ए व ऐ दाखविले. हया पावती मीच दिलेल्या आहेत. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर पावतीस **निशाण क्र. अनुक्रमे १११ ते ११४** देण्यात येत आहे.

**प्रतिवादी १ ते ३ यांचे तर्फे साक्षीदार क्र.०४ यांची उलटतपासणी वादी तर्फे वकील श्री. आर.व्ही.दिवाण यांचे तर्फे शपथेवर सुरु –**

माझे दुकान माघील २२ ते २३ वर्षापासुन आहे. मी विक्री कर दाता आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी आम्ही ग्राहकास पावती देतो त्यावेळी आमचा जी.एस.टी. क्रमांक टाकणे अत्यावश्यक आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या चारही पावत्यावर माझा जी.एस.टी. क्रमांक नाही. हे म्हणणे खरे आहे की, चिंचकरने आमच्या कडुन नेलेल्या सिमेंटचे काय केले याची मला माहिती नाही.

उलटतपास संपला, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(एस.एम.घुगे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

दि. १३–०३–२०२६